वर्ष - 9 । अंक - 151 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 25 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 5 वरुन...

राज ठाकरे महाराष्ट्राचे राजा आहेत का?

## “डायरेक्टर पद झालं म्हणजे काम संपलं का? “हे असं चालणार नाही”

# “तिकीट द्या, तिकीट द्या...” म्हणणाऱ्यांना अजित पवारांचा तडाखा



**महाईन्यूज**

**मुंबई : राज्यातील २९ महापालिका निवडणुकीचा निकाल नुकंताच १६ जानेवारी रोजी जाहीर झाला. या महापालिका निवडणुकीत भाजपा आणि शिंदे सेनेच्या युतीला मोठं यश मिळालं. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पराभवाचा धक्का बसला. महापालिका निवडणुकीनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यामुळे नेते मंडळींचे राज्यातील विविध शहरात दौरे वाढले आहेत.**

अजित पवार हे देखील अनेक ठिकाणी सभा घेत आहेत. आज अजित पवार यांनी एका सभेत बोलताना पदाधिकाऱ्यांना चांगलेच खडेबोल सुनावले आहेत. अजित पवार सभेत बोलत होते मात्र त्याच सभेत काही महत्वाचे पदाधिकारी उपस्थित नव्हते. हे अजित पवार यांच्या लक्षात आल्यानंतर अजित पवार यांनी पदाधिकाऱ्यांना चांगलंच सुनावलं. ‘तिकीट मागताना कसे येता? तिकीट द्या, तिकीट द्या, तिकीट द्या...’, असं म्हणत अजित पवारांनी पदाधिकाऱ्याच्या गैरहजेरीवरून संताप व्यक्त केला.

### नेमकं काय घडलं?

“सर्वसामान्य समाज माझ्याबरोबर आहे आणि राहणारच आहे, कारण मी सर्वसामान्य समाजाबरोबर आहे. मात्र, कोणीही स्वत:ला उघड पाडू नका. मला हे सगळ्या भागांना सांगायचं आहे”, असं अजित पवार एका कार्यक्रमात भाषण करताना बोलत होते. यावेळी अजित पवार यांनी ‘योगेश आलाय का?, स्वप्निल आलाय का?’ असं व्यासपीठावरील पदाधिकाऱ्यांना विचारलं. मात्र, ते उपस्थित नसल्याचं पदाधिकाऱ्यांनी सांगताच अजित पवार यांचा पारा चांगलाच चढला.

# सरकारचा ‘इंडिगो’ला आणखी एक मोठा दणका!

**महाईन्यूज**

**मुंबई : देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोने देशांतर्गत विमानतळांवर ७०० हून अधिक स्लॉट सोडले आहेत. डीजीसीएने कठोर कारवाई केल्यानंतर हे पाऊल उचलले आहे, एअरलाइनला त्यांची हिवाळ्यातील उड्डाणे कमी करण्याचे आदेश दिले गेले होते.**




मागील वर्षी डिसेंबरच्या सुरुवातीला झालेल्या मोठ्या गोंधळामुळे इंडिगोवर ही कारवाई केली गेली आहे. त्या वेळी इंडिगोच्या प्रवाशांना विमानतळांवर तासंतास वाट पाहावी लागली आणि हजारो उड्डाणे रद्द करण्यात आली होती. तर ३ ते ५ डिसेंबर दरम्यान, अंदाजे अडीच हजारांहून अधिक इंडिगो उड्डाणे रद्द करण्यात आली होती तर जवळपास दोन हजार उड्डाणांना विलंब झाला होता. ज्यामुळे देशभरातील लाखो प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला होता. या व्यत्ययाच्या पार्श्वभूमीवर, डीजीसीएने कडक भूमिका घेतली आणि इंडिगोचे हिवाळी वेळापत्रक १० टक्क्यांनी कमी केले. याचा अर्थ एअरलाइनला त्यांच्या काही सेवा रद्द कराव्या लागणार आहेत. या आदेशानंतर, इंडिगोने आता मंत्रालयाला ७१७ रिकाम्या स्लॉटची यादी सादर केली आहे. स्लॉट म्हणजे विमानाला विमानतळावर उतरण्यासाठी आणि निघण्यासाठी दिलेला निश्चित वेळ असते.

इंडिगोच्या रिकाम्या झालेल्या स्लॉटपैकी सर्वात मोठा भाग देशातील प्रमुख महानगरांमध्ये आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ७१७ स्लॉटपैकी ३६४ स्लॉट दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू आणि हैदराबाद या सहा प्रमुख मेट्रो विमानतळांवर आहेत. यापैकी हैदराबाद आणि बेंगळुरूमध्ये सर्वाधिक स्लॉट असल्याचे म्हटले जाते. हे स्लॉट जानेवारी ते मार्च या कालावधीसाठी रिकाम्या करण्यात आले आहेत. यावर नागरी उड्डाण मंत्रालयाने तात्काळ प्रतिसाद दिला आहे आणि इतर विमान कंपन्यांकडून अर्ज मागवले आहेत. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी इतर विमान कंपन्यांनी या रिकाम्या स्लॉटचा वापर करावा अशी सरकारची इच्छा आहे.

# कोण भूषवणार पुण्याचे ५८ वे 'महापौर' पद?

## पुणे महापालिकेच्या ५८व्या महापौरपदासाठी राजकीय हालचालींना वेग

**महाईन्यूज**
**पुणे:** पुणे महापलिकेत भाजपने तब्बल ११९ जागा मिळवून सत्ता प्रस्थापित केली आहे. त्यामध्ये सर्वधिक महिला नगरसेवक आहेत. पुणे महापालिकेचे आरक्षण महिला खुला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. पुणे महापालिकेवर महिलाराज असणार आहे. अशातच महापौरपदाबाबत तारीख ठरल्याची माहिती समोर आली आहे.



### ही नावे महापौरपदासाठी संभाव्य उमेदवार

पुणे महापालिका निवडणुकीत भाजपने ११९ जागांवर दणदणीत विजय मिळवत स्पष्ट बहुमत सिद्ध केले आहे. त्यामुळे महापौरपद भाजपकडेच जाणार, याबाबत फारशी शंका नव्हती. मात्र, आरक्षण जाहीर न झाल्याने महापौरपदासाठीच्या नावावर चर्चा रखडली होती. अखेर मुंबईतील मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत आरक्षणाची सोडत पार पडली. या सोडतीत पुणे महापालिकेसाठी सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर होताच भाजपमधील महिला नगरसेविकांची नावे चर्चेत आली आहेत. सध्या भाजपमधून वर्षा तापकीर, मंजुषा नागपुरे, स्वरदा बापट आणि रंजना टिळेकर ही नावे महापौरपदासाठी संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहेत. पक्ष नेतृत्वाकडून लवकरच अंतिम निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे.

जानेवारी शेवटच्या आठवड्यात ३० आणि ३१ तारखेला महापौरपदाच्या निवडीचा कार्यक्रम होणार आहे. १ फेब्रुवारीपासून पुण्याला महापौर मिळणार आहे. पुणे महापालिकेचे ५८ वे महापौर कोण होणार याबाबत उत्सुकता वाढली आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत भाजपची एकहात्ती सत्ता आली आहे. त्यानंतर महापौरपदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यात महापौरपद महिला खुला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. आता महापौरपदाची निवड करण्यासाठी प्रक्रिया सुरू होणार आहे. विभागीय आयुक्त या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी यांची नियुक्ती करणार आहे. त्यानंतर सर्वसाधारण सभा सात दिवसांत घेण्याची नोटीस काढली जाते. महापौरपदाची निवडणूक होणार त्या दिवशी सभा सुरू झाल्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांची मुदत दिली जाते. त्यानंतर महापौरपदासाठी मतदान घेतले जाते. संबंधित पीठासीन अधिकारी महापौरपदी निवडून आलेल्या व्यक्तीची घोषणा करतात. महापौरपदाची निवडणूक प्रक्रिया करण्यासाठी पीठासीन अधिकारी यांची नियुक्ती केली जाते. त्यानंतर सात दिवसांची मुदत देऊन सभा बोलवावी लागते.

# जिल्हा परिषदेसाठी आता दुपटीऐवजी चारपट मशीन उपलब्ध

**महाईन्यूज**
**पुणे:** महापालिका निवडणुकीत मतदान यंत्र आणि कंट्रोल युनिट बंद पडण्याच्या हजारांहून अधिक तक्रारी आल्यानंतर खडबडून जागे झालेल्या राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मतदान यंत्रांची उपलब्धता दोनऐवजी चारपट केली आहे. महापालिका निवडणुकीत बंद पडलेली ही सर्व यंत्र भोसरी येथील गोदामात सीलबंद करून ठेवली असून, नगरपरिषदा व महापालिकेच्या निवडणुकीत वापरलेल्या सुस्थितीत असलेल्या यंत्रांचा वापर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे.



> महापालिका निवडणुकीतील अनुभव लक्षात घेता मतदान यंत्र व कंट्रोल युनिट बंद पडल्यानंतर तातडीने नवीन यंत्र व कंट्रोल युनिट बदलण्यासाठी यंत्रांची उपलब्धता चार पट करण्यात आली आहे.
>
> **- नामदेव टिळेकर,**
> **उपजिल्हाधिकारी, निवडणूक यंत्रे व्यवस्थापन कक्ष, पुणे.**

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ३ हजार ६०५ मतदान केंद्र असून, १४ हजारांहून अधिक मतदान यंत्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होत आहे.नगरपरिषदा व त्यानंतर झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत मतदान यंत्र अर्थात इव्हीएम व कंट्रोल युनिट बंद पडण्याच्या अनेक घटना घडल्या. त्यामुळे अनेक मतदान केंद्रांवर अर्धा तास ते एक तास मतदान प्रक्रिया खोळंबली होती. यंत्रांची उपलब्धता कमी असल्याने मतदान यंत्र बदलविण्यासाठी मोठा काळ गेला. त्यामुळे मतदान केंद्रांवर मतदारांच्या मोठ्या रांगा दिसून आल्या. त्याचा फटका साडेपाचनंतरही अनेक मतदान केंद्रांवर रांगा लागल्याचे चित्र नगरपरिषदा क्षेत्रामध्ये तसेच महापालिकेच्या निवडणुकीत दिसून आले. त्याची गंभीर दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी मतदान



यंत्रांची उपलब्धता चारपट करण्याचा निर्णय घेतला आहे.राज्य निवडणूक आयोगाच्या पूर्वीच्या निर्देशानुसार मतदान यंत्रांच्या संख्येनुसार २२० टक्के अर्थात दुपटीहून अधिक यंत्र उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ३ हजार ६०५ मतदान केंद्रांवर ७ हजार ९३१ मतदान यंत्र व ३ हजार ९६६ कंट्रोल युनिट देण्यात आले होते. मतदान प्रक्रिया सुरू असताना यंत्रे व कंट्रोल युनिट बंद पडल्यानंतर तातडीने बदलण्यासाठी आता जिल्ह्यातील ३ हजार ६०५ मतदान केंद्रांवर १४ हजार ४० मतदान यंत्र व ५ हजार ८१३ कंट्रोल युनिट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, महापालिका निवडणुकीत एकूण १ हजार १९२ मतदान यंत्र व ८१२ कंट्रोल युनिट बंद पडले होते. हे सर्व नादुरुस्त यंत्रे जिल्हा प्रशासनाच्या भोसरी येथील गोदामात सीलबंद करून ठेवण्यात आले आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सर्वाधिक ४०० मतदान केंद्र इंदापूर तालुक्यात असून, यासाठी १ हजार ६६४ मतदान यंत्र व ६६० कंट्रोल युनिट देण्यात आले आहेत. सर्वांत कमी १०५ मतदान केंद्र वेल्हा तालुक्यात असून, तेथे ४३७ मतदान यंत्र व १७३ कंट्रोल युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# जुन्या भांडणातून तरुणाचा चाकूने भोसकून खून

## खेड तालुक्यात रक्तरंजित घटना; एकाचा मृत्यू, एक गंभीर जखमी

**महाईन्यूज**

**पिंपरी : जुन्या भांडणाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या तरुणावर चाकूने वार करून खून करण्यात आला. दुसरा तरुण जखमी झाला आहे. ही घटना गुरुवारी (२२ जानेवारी) रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास येळवाडी, ता. खेड येथे घडली. योगेश धाकतोडे (३२) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.**

जुन्या भांडणाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या तरुणावर चाकूने वार करून खून करण्यात आला. दुसरा तरुण जखमी झाला आहे. ही घटना गुरुवारी (२२ जानेवारी) रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास येळवाडी, ता. खेड येथे घडली. योगेश धाकतोडे (३२) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणात महेश विलास धाकतोडे (२९, हिंजवडी) यांनी म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अमोल पोपट वाघ (३०, येळवाडी, ता. खेड) या आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचा भाऊ योगेश धाकतोडे आणि त्याचे मित्र जुन्या भांडणाचा जाब विचारण्यासाठी आरोपीच्या घरी गेले होते. हे भांडण सोडवत असताना आरोपीने योगेश धाकतोडे याच्या बरगड्यांजवळ चाकू खुपसून त्याचा खून केला. एकावरही वार करून त्याला जखमी केले. म्हाळुंगे पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### पत्नीवर चाकूने वार

किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून पत्नीवर भाजी कापण्याच्या सुरीने वार करून तिला जखमी केले. ही घटना गुरुवारी (२२ जानेवारी) रोजी रात्री नेवाळे वस्ती, चिखली येथे घडली. या प्रकरणात महिलेने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पतीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि आरोपी हे पती-पत्नी आहेत. त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. याचा राग आल्याने आरोपीने पत्नीला शिवीगाळ करत मारहाण केली आणि घरातील भाजी कापण्याच्या सुरीने त्यांच्या हाताच्या बोटावर वार करून जखमी केले. चिखली पोलीस तपास करत आहेत.






### पतसंस्थेच्या व्यवस्थापकाकडून ११ कोटींचा अपहार

आळंदी येथील एका नागरी सहकारी पतसंस्थेत बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना २४ नोव्हेंबर २०२५ पूर्वी चावडी चौक, आळंदी येथे घडली. या प्रकरणी ५८ वर्षीय व्यक्तीने आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका आरोपीची पतसंस्थेचा व्यवस्थापक म्हणून निवड करण्यात आली होती. त्याने आपल्या अधिकाराचा गैरवापर करून इतर आरोपींशी संगनमत केले. आरोपींनी बनावट सोने तारण कर्ज प्रकरणे तयार करून ११ कोटी ३ लाख १३ हजार ३८० रुपयांचा अपहार केला. तसेच खोटे अहवाल देऊन पतसंस्थेचा विश्वासघात केला. आळंदी पोलीस तपास करत आहेत.

# शिवसेना (शिंदे) पक्षाच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची निवड

**महाईन्यूज**

**चिंचवड : पिंपरी-चिंचवड महापालिकेतील शिवसेना (शिंदे) पक्षाच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची निवड करण्यात आली. शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांची शनिवारी बैठक पार पडली. यात सर्व नगरसेवकांनी विश्वजित बारणे यांची गटनेतेपदी एकमताने निवड केली. विश्वजित हे खासदार श्रीरंग बारणे यांचे चिरंजीव आहेत.**



महापालिका निवडणुकीत शिवसेनेचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. गटनेता निवडण्यासाठी जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यांची पक्षाने नियुक्ती केली होती. त्यानुसार खांडभोर यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित नगरसेवकांची शनिवारी बैठक झाली. शिवसेना नगरसेवकांनी विभागीय आयुक्त कार्यालयात गटाची नोंदणी केली आहे. शिवसेनेच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली. मावळचे खासदार श्रीरंग बारणे, नगरसेविका सुलभा उबाळे, नगरसेवक निलेश बारणे, निलेश तरस, विश्वजित बारणे, नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस, रेश्मा कातळे यावेळी उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्व नगरसेवकांचे अभिनंदन केले. सर्वांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पिंपरी-चिंचवड शहरात युवा संघटन बळकट केल्यानंतर विश्वजीत बारणे यांनी पश्चिम महाराष्ट्राची जबाबदारी हाती घेतली. संघटनेतील कामकाजाच्या अनुभवानंतर विश्वजीत यांनी पहिल्यांदाच निवडणुकीच्या राजकारणात उडी घेतली. प्रभाग २४ थेरगाव गावठाणमधून त्यांनी शिवसेनेकडून निवडणूक लढविली. त्यांनी प्रतिस्पर्धी असलेल्या माजी उपमहापौर झामाबाई बारणे यांचे पुत्र माजी नगरसेवक राहिलेल्या भाजपच्या सिद्धेश्वर बारणे यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. विश्वजीत यांनी आपल्या नगरसेवकपदाच्या पहिल्या टर्मला सुरुवात केली आहे.

याबाबत विश्वजीत बारणे म्हणाले, शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, लोकसभेतील शिवसेनेचे गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार श्रीरंग बारणे आणि सर्व नगरसेवकांनी माझ्यावर विश्वास ठेवला आहे. या सर्वांचा विश्वास पात्र ठरवेल. सभागृहात शिवसेनेचा आवाज दिसेल. शहराच्या विकासाच्या निर्णयाला शिवसेनेचा नेहमीच पाठिंबा राहील. मात्र, चुकीच्या कामाला तेवढ्याच आक्रमकपणे विरोध केला जाईल.

### कोणत्या पक्षाचे किती नगरसेवक


महापालिका निवडणुकीत भाजपची दुसऱ्यांदा एकहाती सत्ता आली आहे. भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा पराभव केला. भाजपच्या चारही आमदारांनी यशस्वी रणनिती अवलंबून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर मात केली. भाजपचे सर्वाधिक ८४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे केवळ ३७ नगरसेवक निवडून आले. शिवसेना (शिंदे) पक्षाचे सहा आणि एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे.



## भूमिका

**देशाचे माहिती तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन यांनी अलीकडेच स्पष्ट केले की, पाश्चात्त्य देशांच्या तुलनेत भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) नोकऱ्या जाण्याचा धोका कमी आहे. हे विधान भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि कामगार संरचनेच्या वास्तववादी आकलनावर आधारित आहे.**

# एआय क्रांती आणि भारत



भारतातील कार्यबलाचा मोठा हिस्सा कृषी, बांधकाम, वाहतूक, सेवा आणि असंघटित क्षेत्रांत कार्यरत असून या क्षेत्रांत मानवी सहभाग अनिवार्य आहे. त्यामुळे एआय भारतात मानवी श्रमाची जागा घेण्याऐवजी मानवी क्षमता वाढवणारे पूरक साधन ठरत आहे.

जागतिक स्तरावर वापरल्या जाणाऱ्या प्रमुख एआय मंचांच्या एकूण वापरकर्त्यांपैकी सुमारे एक तृतीयांश वापरकर्ते भारतातील आहेत. गुगल आधारित एआय सेवांमध्ये भारताचा सहभाग जवळपास ३० टक्के आहे. ७० कोटींहून अधिक इंटरनेट वापरकर्ते आणि जगातील सर्वात स्वस्त इंटरनेट सुविधा यामुळे भारत हा एआयचा केवळ उपभोक्ता न राहता त्याच्या व्यावहारिक वापराचे आणि नवोन्मेषाचे केंद्र म्हणून पुढे येत आहे. 'बोस्टन कन्सल्टिंग ग्रुप'च्या २०२५ च्या अहवालानुसार भारताची एआय बाजारपेठ ५.५ अब्ज डॉलरवरून येत्या काही वर्षांत १७ अब्ज डॉलरपर्यंत वाढण्याची शक्यता असून, यामागे सुमारे ४० टक्क्यांचा वार्षिक चक्रवाढ विकास दर आहे.

नीती आयोगाच्या 'एआय फॉर विकसित भारत' या अहवालात भारताचा ८ टक्के वार्षिक विकास दर गाठण्यासाठी एआयची भूमिका निर्णायक असल्याचे नमूद केले आहे. बँकिंग आणि वित्त क्षेत्रात कर्ज मूल्यांकन, जोखीम विश्लेषण, फसवणूक ओळख आणि ग्राहक सेवा अधिक अचूक व वेगवान होतील. उत्पादन क्षेत्रात मशिनची आगाऊ दुरुस्ती, गुणवत्ता नियंत्रण आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनामुळे उत्पादन खर्चात लक्षणीय घट होईल.

कृषी क्षेत्रात हवामान अंदाज, पीक व्यवस्थापन आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे. आरोग्य आणि संशोधन क्षेत्रात औषध शोध प्रक्रियेतील वेळ आणि खर्च ६० ते ८० टक्क्यांनी कमी होऊ शकतो.

मानव भांडवल आणि कौशल्य विकास हा भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

सध्या देशात एआयशी संबंधित काम करणारे लाखो व्यावसायिक असून ही संख्या भविष्यात दुप्पट होण्याची शक्यता आहे. विद्यापीठांमध्ये विशेष अभ्यासक्रम, ऑनलाईन शिक्षण मंच, उद्योग-सहभागातून प्रमाणपत्र व्यवस्था आणि प्रशिक्षणावर कर सवलत अशा उपायांद्वारे कौशल्य विकासाला चालना दिली जात आहे. राष्ट्रीय एआय मिशन अंतर्गत प्रगत संगणकीय पायाभूत सुविधा, उच्च क्षमतेचे प्रोसेसर आणि नवीन डेटा सेंटर्स उभारले जात आहेत, ज्यामुळे संशोधन, स्टार्टअप्स आणि नवउद्योजकांना बळ मिळत आहे.

भारतीय स्टार्टअप परिसंस्थेत एआयमुळे आरोग्य, शिक्षण, कृषी तंत्रज्ञान, फिनटेक आणि भाषा तंत्रज्ञान या क्षेत्रांत नवे उपाय विकसित होत आहेत. स्थानिक भाषांतील एआय सेवा ग्रामीण आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. मात्र लघु व मध्यम उद्योगांपर्यंत तंत्रज्ञानाची मर्यादित पोहोच, ग्रामीण भागातील कौशल्य अभाव, डेटा गोपनीयता, नैतिकता आणि पूर्वग्रह यांसारखी आव्हाने कायम आहेत.

नीती आयोगाने पुनर्कौशल्य, आजीवन शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा उपाय सुचवले आहेत. तरुण लोकसंख्या, अफाट डेटा संसाधने, मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा आणि स्पष्ट धोरणात्मक दिशा यामुळे भारताकडे एआयच्या माध्यमातून राष्ट्रीय परिवर्तनाची मोठी संधी आहे. योग्य नियमन, कौशल्य विकास आणि उत्तरदायी प्रशासनाच्या साहाय्याने एआय भारतासाठी रोजगार, समावेशक विकास आणि जागतिक नेतृत्वाचे प्रभावी साधन ठरू शकते.

## प्रासंगिक »

### बळी तो कान पिळी

***एकदा प्राण्यांमध्ये भयानक रोगाची साथ पसरली आणि अनेक प्राणी मरू लागले. देवाचा कोप आपल्या पापांमुळेच झाला असावा, असे सर्वांना वाटले.***

त्यामुळे प्रत्येकाने आपली वाईट कृत्ये कबूल करावीत आणि जो सर्वात मोठा अपराधी ठरेल त्याचा बळी द्यावा, असा निर्णय झाला. ठरलेल्या वेळी सर्व प्राणी जमले आणि न्यायाधीश म्हणून कोल्ह्याची निवड झाली.

सर्वप्रथम सिंह पुढे आला. त्याने अनेक कोकरांना व एका धनगराला मारल्याची कबुली दिली.

मात्र कोल्ह्याने त्याला मोठ्या प्राण्यांना सवलत असते, असे सांगून माफ केले. त्यानंतर वाघ, चित्ता, अस्वल यांनीही आपले गुन्हे मान्य केले; पण त्यांनाही शिक्षा झाली नाही. शेवटी एक गरीब गाढव पुढे आले.

त्याने एका शेतकऱ्याच्या जमिनीतले थोडेसे हिरवे गवत खाल्ल्याची कबुली दिली. ते ऐकताच कोल्हा संतापला आणि देवाच्या कोपासाठी गाढवालाच दोषी ठरवले. त्यानंतर सर्वांनी मिळून त्या निरपराध गाढवाचा बळी दिला.**तात्पर्य–** बळी तो कान पिळी.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इस्रायल-हमास संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक शांतता मंच स्थापन केला असून, त्याला 'बोर्ड ऑफ पीस' असे नाव देण्यात आले आहे. या मंचाचा स्वाक्षरी समारंभ डावोस येथे पार पडला असून, अमेरिका सहित 19 देशांनी त्यात सहभाग घेतला. ट्रंप यांनी भारतालाही या मंचात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले आहे.

# ट्रंप यांचे 'शांतता मंडळ' : उद्देश मोठा, प्रश्न अधिक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावे हे आमंत्रण पाठवण्यात आले असले, तरी भारताने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही. सध्या भारताने 'थांबा आणि पाहा' अशी सावध भूमिका स्वीकारल्याचे चित्र आहे.

या शांतता मंडळाचे स्वरूप, अधिकार, कार्यपद्धती आणि हस्तक्षेपाची मर्यादा अद्याप स्पष्ट नाही. त्यामुळे अनेक देश साशंक आहेत. उद्घाटन कार्यक्रमाला भारताचा प्रतिनिधी अनुपस्थित राहिला, हे याच अनिश्चिततेचे द्योतक मानले जात आहे. अर्जेंटिना, अझरबैजान, पाकिस्तान, कतार, इस्रायल आणि सौदी अरेबिया यांसारख्या देशांनी सहभाग मान्य केला आहे. मात्र, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क आणि इटली यांनी या प्रस्तावाला नकार दिला असून, फ्रान्सही नकार देण्याच्या भूमिकेत असल्याची चर्चा आहे. ब्रिटन, जर्मनी, जपान, भारत आणि चीनसारख्या महत्त्वाच्या देशांनी अद्याप निर्णय घेतलेला नाही.

या मंचाबाबतची सर्वात मोठी शंका म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाशी त्याचे नाते. संयुक्त राष्ट्रसंघाची सुरक्षा परिषद ही जागतिक शांततेसाठी महत्त्वाची संस्था आहे. अमेरिकेचा हा नवा मंच सुरक्षा परिषदेचा पर्याय किंवा प्रतिस्पर्धी ठरेल का, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे सुरक्षा परिषदेतील अमेरिका वगळता अन्य कोणत्याही स्थायी सदस्य देशाचा या मंडळात सहभाग नाही.

या मंचाची प्रेरणा गाझा संघर्षातून मिळाली असली, तरी उद्देशपत्रात गाझाचा थेट उल्लेख नाही. जगातील कोणत्याही भागात सैनिकी संघर्ष निर्माण झाला, तर तो रोखण्याचा प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट या मंचाने मांडले आहे. त्यामुळे या संघटनेची व्याप्ती व्यापक असल्याचे दिसते. मात्र, शांतता प्रस्थापित करण्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबली जाणार, हे अद्याप स्पष्ट नाही.

सध्या जग रशिया-युक्रेन युद्ध, मध्यपूर्वेतील तणाव, अमेरिका-इराण संघर्ष आणि येमेन युद्ध यांसारख्या संकटांनी ग्रस्त आहे. अमेरिका स्वतः अनेक संघर्षांमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागी आहे. त्यामुळे अमेरिकेच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या या शांतता मंचावर विश्वास ठेवण्याबाबत अनेक देश सावध आहेत. अशा परिस्थितीत भारताने या मंचात सहभागी होण्याचा निर्णय घाईने न घेता, त्याचे राजनैतिक, सामरिक आणि दीर्घकालीन परिणाम लक्षात घेऊन विचारपूर्वक भूमिका ठरवणे आवश्यक ठरेल.



## ।। अभंगवाणी ।।



"जगी आलो जगावेगळा, ।  
वाचे दर्शन घ्यावे, ॥१॥

नाव हरिपाठ करित राहो, ।  
जीवन उजळावे." ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज ठाकरे महाराष्ट्राचे राजा आहेत का?

## बिहार सरकारमधील मंत्री अशोक चौधरी यांची मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर जोरदार टीका





**महाईन्यूज**

**मुंबई : मुंबईत बांधण्यात येणाऱ्या 'बिहार भवन'वरून राजकीय वातावरण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळत आहे. बिहार सरकारने मुंबईतील या बिहार भवनाच्या प्रकल्पासाठी ३१४ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.**

मात्र, मुंबईतील मराठी भाषकांकडून या प्रकल्पाला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक यशवंत किल्लेदार यांनी देखील काही दिवसांपूर्वी संताप व्यक्त करत मुंबईत 'बिहार भवन' होऊ देणार नसल्याचा इशारा दिला होता. मुंबईत बिहार भवन बांधण्याचा प्रयत्न केल्यास गाठ मनसेशी असेल, असा इशारा यशवंत किल्लेदार यांनी दिला.

मनसेच्या या इशाऱ्यानंतर आता बिहार सरकारमधील मंत्री अशोक चौधरी यांनी यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. 'राज ठाकरे महाराष्ट्राचे राजा आहेत का?, बिहार भवनाला विरोध करण्याएवढी ताकद कोणामध्येही नाही', असं म्हणत मंत्री अशोक चौधरी यांनी मनसेला डिवचलं आहे. त्यामुळे आता मुंबईतील बिहार भवनाचा मुद्दा आणखी तापण्याची शक्यता आहे.

"बिहारमधील मंत्री अशोक चौधरी यांनी आधी स्वत:चं राज्य व्यवस्थित करावं, म्हणजे त्यांच्या राज्यातील लोक दुसऱ्या राज्यात जाणार नाहीत. स्वत:चं राज्य व्यवस्थित करायचं नाही, ते कर्जबाजारी करून ठेवायचं. दुसऱ्या राज्यात जी लोक जातात, त्यापेक्षा स्वत:चं राज्य व्यवस्थित केलं तर मला वाटतं त्यांच्या राज्यातील लोकांना देखील आनंद होईल. तोंड दिलं आहे म्हणून वाट्टेल ते बोलू नये", असं अविनाश अभ्यंकर यांनी म्हटलं आहे.

"दुसरं त्यांनी विचारलं की राज ठाकरे कोण आहेत? तर राज ठाकरे हे व्यक्ती आहेत, ज्यांनी पंतप्रधान मोदींबरोबर भाजपाच्या आग्रहास्तर शिवतीर्थावर देशाला संबोधित केलेलं आहे. वयाच्या ३८ व्या वर्षी पक्ष काढला आहे असे राज ठाकरे आहेत. मराठी माणसांसाठी, मराठी भाषेसाठी स्वत:वर १०० पेक्षा जास्त केसेस घेणारे राज ठाकरे आहेत. त्यामुळे त्यांचा एक जरी गुण त्यांनी घेतला तरी त्यांचं राज्य सुजलाम् सुफलाम् होईल असं मला वाटतं", असं अविनाश अभ्यंकर यांनी म्हटलं आहे.

### बिहारचे मंत्री अशोक चौधरी काय म्हणाले?

"हा देश आहे, येथे कोणाची जबरदस्ती चालणार नाही. बिहार भवन बनू देणार नाही म्हणतात? हे काय राजतंत्र आहे का? राज ठाकरे महाराष्ट्राचे राजा आहेत का? फालतू गोष्टी सुरूयेत, बिहारमधून उपचारांसाठी जे लोक मुंबईत जातात, त्यांना काही अडचण येऊ नये म्हणून ते बांधलं जात आहे. आणखी काही राज्यांमध्ये देखील बांधण्यात येणार आहे. कोणाचीही ताकद नाही की हे ते रोखतील", असं बिहारचे मंत्री अशोक चौधरी यांनी म्हटलं आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी दोन्ही शिवसेनेची युती

**महाईन्यूज**

**सावंतवाडी : राज्यातील सध्याचे राजकारण हे शिसारी आणणारे आहे, असे विधान राज ठाकरे यांनी नुकतेच केले होते. राज्यात कोणता पक्ष कोणाबरोबर आघाडी करतोय, याचा काहीच नेम नाही. भाजपा आणि एमआयएमचीही आघाडी झालेली पाहायला मिळाली आहे.**





तर अंबरनाथमध्ये भाजपा आणि काँग्रेस एकत्र आलेले पाहायला मिळाले होते. तर पुण्यात दोन्ही राष्ट्रवादीने युती केली होती. आता सोलापूरच्या बार्शीमध्ये दोन्ही शिवसेना एकत्र आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे दिसत आहे.

एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची सोलापूरच्या बार्शी तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आघाडी झाली आहे. बार्शीचे शिवसेनेचे (ठाकरे) आमदार दिलीप सोपल यांच्या एका पत्रकामुळे तर्क-वितर्क लढवले जात आहेत. शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी मात्र याबाबत कोणतीही माहिती नसल्याचे म्हटले आहे. संजय राऊत यांच्याशी संवाद साधून त्यांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावर ते म्हणाले, "बार्शी तालुक्यात सर्व पक्ष भाजपाविरोधात एकत्र आल्याची माहिती आम्हाला मिळाली. आमच्या पक्षप्रमुखांनाही बार्शीतील संपूर्ण घडामोडींची माहिती नाही. आम्ही माहिती गोळा करत आहोत."

### शिंदेंनी ठाकरेंशी हातमिळवणी करावी – भास्कर जाधव

शिवसेनेचे (ठाकरे) ज्येष्ठ नेते भास्कर जाधव यांनी गुरूवारी केलेल्या आवाहनंतर बार्शीतील घडामोड घडली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगरपालिकेत उद्धव ठाकरेंना पाठिंबा देण्याचे धाडस दाखवावे, असे आवाहन जाधव यांनी केले होते."बाळासाहेब ठाकरेंच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेनेचा भगवा झेंडा मुंबई महापालिकेवर फडकायला हवा. बाळासाहेबांचे स्वप्न होते की, सेनेचाच महापौर व्हावा. एकनाथ शिंदे केंद्रात आणि राज्यात सत्तेत राहू शकतात, पण मुंबईत त्यांनी ठाकरेंना पाठिंबा द्यावा", असे भास्कर जाधव म्हणाले होते.

परभणीचे शिवसेनेचे (ठाकरे)खासदार संजय जाधव यांनीही पवार कुटुंबाचे उदाहरण देत दोन्ही शिवसेना पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले होते.

### आमदार दिलीप सोपल यांनी केले आघाडीचे आवाहन

शिवसेनेचे (ठाकरे) आमदार दिलीप सोपल यांनी जिल्हा परिषदेसाठी महाआघाडी झाल्याचे आपल्या सोशल मीडियावर जाहीर केले आहे. "जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी बार्शी तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आणि मित्र पक्षाच्या वतीने 'महाआघाडी' करण्यात आली असून या माध्यमातून निवडणूक लढविण्यात येईल", अशा आशयाची पोस्ट करत सोपल यांनी आज निर्धार मेळावा आयोजित केला आहे. मेळाव्याच्या पत्रकावर शिवसेनेचे धनुष्यबाण आणि उद्धव ठाकरेंचे मशाल हे चिन्ह एकत्र दिसत आहे. तसेच उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, शरद पवार, अजित पवार यांचे फोटोही एकत्र दिसत आहेत.

# अमेरिका-इराणमधील तणाव शिगेला!

## इराणचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इशारा

**महाईन्यूज**

**इराणने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इशारा दिला आहे. तेहरानवर झालेला कोणताही हल्ला हा 'आमच्या विरोधातील निर्णायक युद्ध' मानले जाईल असे इराणने म्हटले आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या युद्धनौकांचा 'मोठा ताफा' इराणकडे कूच करत असल्याचे विधान केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी हा इशारा देण्यात आला आहे.**



इराणच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने म्हटले आहे की, अमेरिकेच्या सततच्या लष्करी धोक्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी अयातुल्ला खामेनी यांची राजवट त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व संसाधनांचा वापर करेल असे त्यांनी सांगितले.

"यावेळी, आम्ही कोणताही हल्ला – मर्यादित, अमर्यादित, सर्जिकल, कायनेटीक, ते याला काहीही म्हणोत – आमच्या विरोधात पुकारलेले निर्णायक युद्ध असेच मानू, आणि हे संपवण्यासाठी शक्य तेवढ्या कठोरपणे त्याला प्रत्युत्तर देऊ," असे इराण सरकारच्या अधिकाऱ्याने रॉयटर्सशी बोलताना सांगितले.

ट्रम्प यांनी अमेरिकन युद्धनौकांचा एक मोठा ताफा इराणच्या दिशेने रवाना झाल्याचे सांगितल्यानंतर इराणने हा इशारा दिला आहे. इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून सरकारविरोधात निदर्शने सुरू आहेत. यादरम्यान आंदोलकांच्या हत्या केल्या जात असल्याच्या मुद्द्यावरून ट्रम्प यांनी इराणवर लष्करी कारवाई करण्याची धमकी दिली होती. मात्र नंतर ट्रम्प यांनी यापासून माघार घेतल्याचे दिसून आले होते. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून इराणमधील खामेनी राजवटीविरुद्ध सुरू असलेल्या या आंदोलनांमध्ये आतापर्यंत ५ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात आहे.

इराणच्या अधिकाऱ्याने सांगितले की तेहरान हाय अलर्टवर आहे, मात्र असे असले तरी इराणकडून दिले जाणारे प्रत्युत्तर कोणत्या स्वरुपाचे असेल याबद्दल मात्र त्यांनी फारशी माहिती दिली नाही.

"ही सैन्याची वाढलेली तैनाती, आम्हाला आशा आहे की प्रत्यक्ष संघर्षासाठी नसावी. पण आमचे लष्कर कोणत्याही वाईटात वाईट प्रसंगासाठी तयार आहे. याच कारणामुळे इराणमध्ये सर्वकाही हाय अलर्टवर आहे," असे अधिकाऱ्याने सांगितले.

"अमेरिकेच्या सततच्या लष्करी धोक्याखाली असलेल्या एका देशाकडे इराणवर हल्ला करण्याचे धाडस दाखवेल त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी आणि पुन्हा समतोल निर्माण करण्यासाठी आपल्याकडील सर्वकाही वापरणे, याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय उरत नाही," असेही ते पुढे बोलताना म्हणाले.


### इराण-अमेरिकेत तणाव!

विमानवाहू युद्धनौका अब्राहम लिंकन आणि टॉमहॉक क्षेपणास्त्रांनी सज्ज तीन डिस्ट्रॉयर युद्धनौका मध्य पूर्वेकडे जात आहेत, असे वृत्त एनवायटीने दिले आहे. तसेच अमेरिकेच्या हवाई दलाने देखील डझनभर F-15E फायटर जेट्स या भागात पाठवले आहेत.

# दीड तासाच्या उपचारांसाठी मोजले १.६५ लाख; अमेरिकेतील आरोग्य व्यवस्थेचे विदारक वास्तव

**महाईन्यूज**

**रुग्णालयात चांगले उपचार मिळावेत यासाठी लोक भरपूर खर्च करताना पाहायला मिळतात. अमेरिकेमध्ये तर अगदी किरकोळ वैद्यकीय उपचारांसाठीही रुग्णालयात भरमसाठ पैसा मोजावा लागतो. अमेरिकेतील आरोग्य सेवांचे विदारक चित्र दाखवून देणारे असेच एक उदाहरण समोर आले आहे.**




### अमेरिकेतील हेल्थकेअर धोरण काय आहे?

अमेरिकेत एक अत्यंत गुंतागुंतीची हेल्थकेअर सिस्टम आहे, ज्याची धोरणे फेडरल आणि स्टेट सरकारे ठरवतात. बहुतांश अमेरिकन नागरिकांना इन्शुरन्सच्या माध्यमातून आरोग्यसेवा दिली जाते, जी खासगी किंवा सरकारकडून चालवली जाते. प्रायव्हेट इन्शुरन्स स्कीम या सामान्यतः व्यक्ती नोकरी करत असलेली कंपनी देते किंवा वैयक्तिकपणे विकत घ्यावी लागते. पब्लिक इन्शुरन्स स्कीम हा सरकारी प्रोग्राम आहे, ज्यामध्ये विशिष्ट गटांना कव्हरेज दिले जाते. यामध्ये मेडीकेअरचा समावेश असतो. फेडरल प्रोग्राम हा ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या नागरिकांसाठी किंवा विशिष्ट अपंगत्व असलेल्यांसाठी असतो.

येथे एका व्यक्तीला त्याच्याकडे चांगला मेडिकल इन्शुरन्स असताना देखील, अवघ्या दीड तासांच्या रुग्णालयातील उपचारांसाठी १८०० अमेरिकन डॉलर्स म्हणजेच सुमारे १.६५ लाख रूपयांचे बिल भरावे लागले आहे.

नेमकं काय झालं याबद्दल बोलताना या व्यक्तीने सांगितले की, ख्रिसमसच्या दिवशी त्याच्या कुटुंबाबरोबर न्यूयॉर्क येथे आईस स्केटिंग करताना त्याच्या गुडघ्याला जखम झाली होती. "मला माझ्या गुडघ्यामध्ये तीव्र वेदना जाणवत होत्या आणि मला फ्रॅक्चर झाल्याची शंका वाटत होती. मी टॅक्सीने रुग्णालयापर्यंत गेलो आणि दीड तासाच्या सुमारास इमर्जन्सी रूममध्ये होतो. तेथील डॉक्टरांनी माझी तपासणी केली, एक्स-रे काढला आणि माझ्या गुडघ्याभोवती क्रेप बँडेज गुंडाळली."

त्याने पुढे सांगितले की रुग्णालयात गेल्यापासून सुमारे तीन आठवड्यानंतर मला इन्शुरन्स कंपनीने कळवले की त्यांना १८०० डॉलर्स म्हणजेच जवळपास १.६५ लाख रुपये स्वतःच्या खिशातून भरावे लागतील. इन्शुरन्स कंपनीने सांगितले की ते बिलाची उरलेली रक्कम भरतील, जी की ६३५४ डॉलर्स (सुमारे ५.८ लाख) इतकी होती.

या व्यक्तीने आपला व्यथा मांडल्यानंतर सोशल मीडियावर लोक भरभरून प्रतिक्रिया देत आहे. "अमेरिकेची व्यवस्था एका गोष्टीत एका बाबतीत खरंच आघाडीवर आहे: किरकोळ दुखापतीला मोठ्या फायनान्शिअल ट्रॉमा बनवण्यामध्ये," असे एका यूजरने म्हटले आहे. अनेकांनी भारत आणि कॅनडा येथील आरोग्यासंबंधित पायाभूत सुविधांची अमेरिकेशी तुलना देखील केली आहे.

# राणी मुखर्जीचा मोठा खुलासा

बॉलिवूड अभिनेत्री राणी मुखर्जी यंदा चित्रपटसृष्टीत आपले ३० वर्ष पूर्ण करत आहे. सध्या ती आपल्या आगामी चित्रपट 'मर्दानी 3'च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. याच दरम्यान राणीने आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत आणि करिअरच्या सुरुवातीबाबत एक भावूक खुलासा केला आहे. यशराज स्टुडिओमध्ये दिग्दर्शक करण जोहरसोबत संवाद साधताना राणीने सांगितलं की, तिचे आई-वडील तिला खूप कमी वयात लग्न लावून द्यायच्या विचारात होते.

घरच्यांना राणीने काम करावं असं वाटत नव्हतं राणीने सांगितलं की, जरी ती फिल्मी कुटुंबातून आली असली तरी तिच्या घरात परिस्थिती फारशी चांगली नव्हती. तिचे वडील राम मुखर्जी चित्रपट निर्माता होते, मात्र घरखर्च कसाबसा भागत होता.

"माझ्या आई-वडिलांनी कधीच असा विचार केला नव्हता की मी चित्रपटात काम करेन. घराची जबाबदारी मुलांवरच असते, अशीच त्या काळी धारणा होती. त्यामुळे माझ्या बाबतीत लग्न हा एकमेव पर्याय मानला जात होता," असं राणीने स्पष्ट केलं.


आईमुळे मिळाली पहिली फिल्म

राणीने सांगितलं की, वडिलांचे मित्र सलीम अख्तर यांनी तिला 'राजा की आएगी बारात' या चित्रपटाची ऑफर दिली होती. त्यावेळी तिच्या आईनेच तिला हा चित्रपट स्वीकारण्याचा सल्ला दिला.

"त्या वेळी मला कळलंच नव्हतं, पण माझी आई कदाचित घरची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा विचार करत होती. आज मागे वळून पाहताना ते सगळं लक्षात येतं," असं राणी म्हणाली.

1996 मध्ये केला होता डेब्यू

राणी मुखर्जीने (RANI MUKERJI ) 1996 साली 'राजा की आएगी बारात' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. चित्रपट फारसा यशस्वी ठरला नाही, पण राणीची ओळख निर्माण झाली.



# आई, वडील, बहीण कुटुंब नसतं का? नवराचं फक्त...

अभिनेत्री अमृता खानविलकरने अलीकडेच नव्या घरात गृहप्रवेश केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला होता. अभिनेत्रीच्या या व्हिडीओवर मराठी कलाकारांसह तिच्या चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. मात्र यावेळी पती हिमांशू मल्होत्रा दिसला नाही. यावरून काही नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर टीका केली आहे. ज्यानंतर अमृताने देखील ट्रोल करणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिले आहे.

एका नेटकऱ्याने अमृताच्या व्हिडीओवर कमेंट करत "या सोहळ्यात तुझा नवरा कुठे आहे?" असा प्रश्न विचारला होता. यावर अमृताने, "जा आणि माझा युट्यूब व्हिडीओ बघा..." असं उत्तर दिलं आहे. तर, दुसऱ्या एका युजरने व्हिडीओवर अमृता आणि हिमांशूच्या नात्याबद्दल नकारात्मक कमेंट केली. 'तिचं तिच्या पतीसोबत विचित्र नातं असल्याचे दिसते', अशी एक कमेंट युझरने केली. त्यावर अमृताने रोखठोक उत्तर देत म्हंटले की, "यात काय विचित्र काय आहे? त्याला गृहप्रवेश पूजेला पोहोचण्यासाठी थोडा उशीर झाला. सगळेच मला या गोष्टीवरून बोलत आहे. तू एक फेसलेस व्यक्ती आहेस, जी डीपी सुद्धा ठेवत नाही आणि नकारात्मक विचार करते. जर कलाकार काही बोलत नाही, याचा अर्थ असा नाही की ते कधीच काही बोलणार नाही. जरा सांभाळून बोलत जा. आई, वडील, बहीण हे आपलं कुटुंब नसतं का? की नवराच सर्वस्व आहे तुमचं? तसं असेल तर फारच बिचाऱ्या आहात तुम्ही आणि तुमचं आयुष्य", असे सडेतोड उत्तर तिने दिले आहे. दरम्यान, अमृता खानविलकरने नव्या घराला 'एकम' असं नाव दिलं आहे. "स्वकष्टाने उभारलेलं हे आमचं 'एकम'...'एकम' म्हणजे एक- जिथून सगळंच नव्याने सुरू होतं, उत्सुकता, समाधान, प्रेम, आणि डोळ्यात स्वप्नांचं आभाळ,"असं कॅप्शन देत अमृताने गृहप्रवेशाचा व्हिडिओ शेअर केला होता.



# सोनम कपूरचा मॅटरनिटी लूक व्हायरल



बॉलीवूडची गॉर्जियस अभिनेत्री सोनम कपूर हिने पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे की ती एक अल्टिमेट फॅशनिस्टा आहे. सोनम कपूरच्या लेटेस्ट मॅटरनिटी फोटोशूटने सोशल मीडियावर चाहत्यांना आकर्षित केले आहे. ४० वर्षांची सोनम कपूर दुसऱ्यांदा आई होणार आहे. ती आपल्या प्रेग्नन्सीचा हा खास काळ मनापासून एन्जॉय करताना दिसत आहे. सोनमच्या चेहऱ्यावरचा प्रेग्नन्सी ग्लो अगदी स्पष्टपणे दिसून येतोय. सोनमने नुकताच एक मॅटरनिटी फोटोशूट केला असून, त्यामध्ये ती ऑल ब्लॅक आउटफिटमध्ये एखाद्या डीवापेक्षा कमी दिसत नाही. तिने ब्लॅक क्रॉप टॉप आणि लॉंग स्कर्ट असा लूक कॅरी केला आहे.

ब्लॅक आउटफिटसोबत तिने ब्लॅक बंगडी स्टाइल केली आहे. मिडल पार्टेड ओपन हेअर आणि न्यूड, ग्लोइंग मेकअपमध्ये सोनम अतिशय स्टनिंग दिसत आहे. तिचा हा अंदाज पाहून चाहते अक्षरशः थक्क झाले आहेत.



# पतीचा दावा; तिला स्पर्श केल्यावर

'कांटा लगा गर्ल' अभिनेत्री शेफाली जरीवालावर काळी जादू करण्यात आली होती, त्यामुळेच तिचा मृत्यू झाला, असा दावा तिचा पती पराग त्यागी याने केला आहे. एका पॉडकास्टमध्ये परागने हा खळबळजनक दावा केला आहे आणि हे पूर्ण सत्य असल्याचे म्हटले आहे.

शेफाली जरीवालाच्या निधनाने तिचे मित्र आणि कुटुंबीय धक्क्यात आहेत. संपूर्ण मनोरंजन सृष्टीला मोठा धक्का बसला होता. तिचा पती पराग त्यागी अजूनही या दुःखातून सावरण्याचा प्रयत्न करत आहे. आपल्या पत्नीच्या आठवणीत जीवन समर्पित करणाऱ्या परागने अलीकडेच शेफालीच्या मृत्यूबद्दल एक दावा केला आहे. पारस छाबडाच्या पॉडकास्टमध्ये परागने दावा केला आहे की, त्याच्या पत्नीवर काळी जादू करण्यात आली होती. शेफालीवर दोनदा झाली होती काळी जादू

काळ्या जादूच्या दाव्याबद्दल बोलताना पराग म्हणाला, "खूप लोक या गोष्टींवर विश्वास ठेवत नाहीत, पण माझा यावर खूप विश्वास आहे. जिथे देव आहे तिथे सैतानही आहे. लोकांना स्वतःच्या दुःखापेक्षा दुसऱ्याच्या सुखाचे जास्त दुःख आहे. मला नक्की माहित आहे की हे कोणी केले आहे. मी त्याच नाव घेऊ शकत नाही, पण कोणीतरी नक्कीच केले आहे आणि मला काहीतरी अघटित घडत असल्याचे जाणवत होते. एकदा नाही तर दोनदा मला असे वाटले. पहिल्यांदा ती त्यातून बाहेर पडली, पण यावेळी परिस्थिती खूप गंभीर होती. मला माहित नाही नक्की काय होते ते."

# बांगलादेश टी-२० वर्ल्डकपमधून बाहेर

## ICC नं थेट जाहीरच करून टाकलं, मतदानातही BCB तोंडावर आपटलं

**महाईन्यूज**

**नवी दिल्ली :** **टी-२० विश्वचषक २०२६ अवघ्या १५ दिवसांवरून येऊन ठेपला आहे. विश्वचषकातील सर्व संघ या मोठ्या आयसीसी स्पर्धेसाठी जोमाने तयारी करत आहेत. पण बांगलादेशच्या संघाने मात्र टी-२० वर्ल्डकप भारतात खेळायचा नसल्याने मोठा गोंधळ घातला होता.**



बांगलादेशचा संघ वर्ल्डकपमधून बाहेर पडल्याचं अधिकृतरित्या आयसीसीने जाहीर केल्याचं समोर आलं आहे. बांगलादेश क्रिकेट संघाला २०२६ च्या टी२० विश्वचषकातून अधिकृतपणे बाहेर करण्यात आलं आहे. क्रिकबझने वृत्त दिलं आहे की बांगलादेश संघ ७ फेब्रुवारीपासून भारतात सुरू होणाऱ्या २०२६ च्या टी२० विश्वचषकात सहभागी होणार नाही. आयसीसीने बांगलादेशला विचार करण्यासाठी व अंतिम निर्णय घेण्यासाठी पुरेसा वेळ दिला होता आणि अखेर शनिवारी, २४ जानेवारी रोजी कठोर कारवाई केली आहे.

बांगलादेशच्या मागण्या आयसीसीच्या धोरणानुसार नसल्याचे सांगत सीईओ संजोग गुप्ता यांनी आयसीसी बोर्डाला औपचारिक पत्र लिहिल्यानंतर शनिवारी आयसीसीने हा निर्णय घेतला. सर्व बोर्ड सदस्यांना लिहिलेल्या पत्रात, संयोग गुप्ता यांनी बांगलादेश क्रिकेट बोर्ड (बीसीबी) आयसीसी बोर्डाच्या निर्णयाचे पालन करत नसल्याचं म्हटलं आहे.

याशिवाय टी-२० विश्वचषक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बांगलादेशला वगळता त्यांच्या जागी स्कॉटलंडला आमंत्रित करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असंही सांगितलं. या पत्राची प्रत आयसीसी बोर्डाचे सदस्य असलेले बीसीबी अध्यक्ष अमिनुल इस्लाम यांनाही पाठवण्यात आली आहे.

क्रिकबझने क्रिकेट स्कॉटलंडचे सीईओ लिंडब्लेड यांच्याशी संपर्क साधला. पण त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. परंतु दुबई आणि एडिनबर्ग यांच्यात संपर्क झाल्याची माहिती हा रिपोर्ट लिहून होईपर्यंत समोर आली. या बदलाचा अर्थ असा आहे की स्कॉटलंड आता स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात क गटात असेल आणि कोलकाता येथे वेस्ट इंडिज (७ फेब्रुवारी), इटली (९ फेब्रुवारी) आणि इंग्लंड (१४ फेब्रुवारी) विरुद्ध स्पर्धेतील सामने खेळेल. या सामन्यांनंतर, संघ १७ फेब्रुवारी रोजी मुंबईत नेपाळविरुद्ध सामना खेळेल.

### टी२० विश्वचषक २०२६ मधील सर्व गट

गट अ – भारत, अमेरिका, नेदरलँड्स, नामिबिया, पाकिस्तान.
गट ब – श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, झिम्बाब्वे, ओमान, आयर्लंड.
गट क – इंग्लंड, वेस्ट इंडिज, स्कॉटलंड, इटली, नेपाळ (क्रिकबझ).
गट ड – अफगाणिस्तान, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, कॅनडा, युएई.



# ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटीसाठी भारताचा महिला संघ जाहीर

**महाईन्यूज**

**नवी दिल्ली :** **भारताचा पुरूष संघ कसोटी क्रिकेटपासून दूर असताना आता टीम इंडियाच्या चाहत्यांना महिला संघाचा कसोटी सामना पाहण्याची संधी मिळणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघ फेब्रुवारीमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. यादरम्यान दोन्ही संघांमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये मालिका खेळवली जाणार आहे. यामधील कसोटी सामन्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे.**



### भारताचा कसोटीसाठी संघ

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना, शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, अमनजोत कौर, ऋचा घोष (यष्टीरक्षक), उमा छेत्री (यष्टीरक्षक), प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, रेणुका सिंग, स्नेह राणा, क्रांती गौड, वैष्णवी शर्मा, सायला सतघरे.

भारतीय संघ फेब्रुवारी-मार्चमध्ये ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे, जिथे संघ एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळतील. या दोन मालिकांनंतर, दौऱ्याचा शेवट पर्थमध्ये होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्याने होईल. ऑस्ट्रेलियाच्या घरच्या मैदानावर होणारी ही मालिका ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिली तिच्या कारकिर्दीतील अखेरचा सामना खेळणार आहे. एलिसाने काही दिवसांपूर्वीच भारताविरूद्धची मालिका खेळत निवृत्त होणार असल्याचं सांगितलं.

७ ते ९ मार्च २०२६ दरम्यान भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघांमध्ये कसोटी सामना खेळवला जाणार आहे. हरमनप्रीत कौर पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व करणार आहे, तर स्मृती मानधना उपकर्णधार असेल. तर सलामीवीर शफाली वर्मानेही तिच्या अलीकडील चांगल्या फॉर्ममुळे संघात स्थान मिळवलं आहे. या दौऱ्यासाठी पहिल्यांदाच काही खेळाडूंना कसोटी संघात स्थान मिळालं आहे, ज्यात प्रतिका रावलचा समावेश आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या विश्वचषकादरम्यान तिला दुखापत झाली होती, ज्यामुळे ती उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत खेळू शकली नाही.

प्रतिका रावल वुमन्स प्रीमियर लीगमध्ये देखील खेळत नाहीये आणि याचबरोबर ती ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या टी-२० व वनडे मालिकेतूनही बाहेर झाली आहे. पण कसोटी संघात मात्र तिची निवड करण्यात आली आहे. प्रतिका व्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या तीन तरुण खेळाडूंना कसोटी संघात संधी मिळाली आहे. त्यात अष्टपैलू अमनजोत कौर आणि तरुण वेगवान गोलंदाज क्रांती गौड यांचा समावेश आहे.

क्रांती व अमनजोत कौर एकदिवसीय आणि टी-२० स्वरूपात चांगली कामगिरी करत आहेत आणि संघाच्या विश्वचषक विजयात त्यांचे महत्त्वाचे योगदान होते. डिसेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या २० वर्षीय डावखुरी फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्मालाही कसोटी संघात संधी देण्यात आली आहे.

बीसीसीआयने आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेसाठी भारतीय महिला अ संघाचीही घोषणा केली आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा अनुभव असलेल्या काही खेळाडूंचा समावेश आहे. यामध्ये सर्वात अनुभवी डावखुरी फिरकीपटू राधा यादव आहे, तिला संघाचा कर्णधार देखील बनवण्यात आले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। रविवार ।
दि. 25 जानेवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# नवा ‘कारभारी’ कोण?




## महापौर निवड ६ फेब्रुवारीला; भाजपमध्ये महापौरपदासाठी चुरस

**महाईन्यूज**

**पिंपरी :** **पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक सहा फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज दोन फेब्रुवारी रोजी दुपारी तीन ते पाच या वेळेत नगरसचिवांकडे दाखल करता येणार आहेत. महापौर पदाचे आरक्षण खुल्या (सर्वसाधारण) प्रवर्गासाठी राखीव झाल्याने भाजपमधील इच्छुक नगरसेवकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि.६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत स्थायी समितीसह विविध ५ विशेष समित्यांच्या सदस्यांची देखील नियुक्ती केली जाणार आहे, अशी माहिती आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या पदासह उपमहापौर पदाची निवड विशेष सभेत केली जाणार आहे. याबाबत पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आले आहेत. या सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून सहकार आयुक्त दिपक तावरे काम पाहणार आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीसाठी विशेष सभा बोलावली जाते. यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष सभा ६ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. या सभेत महापौर व उपमहापौर यांच्यासह स्थायी समिती व विविध ५ विशेष समितीच्या सदस्यांची नियुक्ती आहे . केली जाणार आहे.


महापौर व उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्राचे छापील फॉर्म्स महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावर असणाऱ्या नगरसचिव कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरिता सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते ५ ही वेळ निश्चित करण्यात आली आहे. नामनिर्देशन पत्र नगरसचिव कार्यालयात विहित वेळेत स्वीकारली जाणार आहेत, असे नगरसचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

### चिंचवड की भोसरीकडे महापौरपद?

महापालिकेत २०१७ मध्ये भाजपची सत्ता आल्यानंतर पहिले अडीच वर्षे महापौरपद भोसरी मतदारसंघाकडे होते. आमदार महेश लांडगे यांचे समर्थक नितीन काळजे आणि राहुल जाधव दोघांना सव्वा-सव्वा वर्षे महापौरपदाची संधी मिळाली होती. दोघे नागरीकांचा मागास प्रवर्गातून महापौर झाले होते. दुसऱ्या अडीच वर्षात चिंचवड विधानसभा मतदारसंघातील उषा ढोरे या महिला खुला प्रवर्गातून महापौर झाल्या होत्या. अडीच वर्षे त्यांना महापौर म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. आता चिंचवड की भोसरी मतदारसंघाकडे महापौरपद राहणार याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

**स्थायी समितीवर १६ तर विशेष समितीवर ९ सदस्यांची केली जाणार नियुक्ती**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच विविध ५ विशेष समित्यांवर प्रत्येकी ९ सदस्यांची निवड देखील ६ फेब्रुवारी रोजी आयोजित विशेष सभेत करण्यात येणार आहे. विशेष समितीवर सदस्यांच्या नियुक्ती करताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पक्षांच्या किंवा गटाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात येणार महिला व बालकल्याण समितीवर कमीतकमी ७५ टक्के सदस्य महिला सदस्यांमधून नियुक्त केले जाणार आहेत, अशी माहिती नगरसचिव मुकेश कोळप यांनी दिली.



# थकबाकीदारांनो सावधान! PCMCची जप्ती कारवाई सुरू




## पहिल्या टप्प्यात थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येणार

**महाईन्यूज**

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून २१ जानेवारी २०२६ पासून ही मोहिम शहरभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.**

### ३५ मालमत्ता जप्त तर १३३ नळ कनेक्शन खंडित..

पिंपरी चिंचवड महापालिकेने कर संकलन मोहिमेला गती दिली असून, या कारवाईसाठी १८ विभागीय कार्यालयांतील सर्व गटप्रमुखांना जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार शहरातील निवासी व बिगरनिवासी थकबाकीदारांवर कठोर कारवाई सुरू आहे. आतापर्यंत शहरातील ३५ मालमत्तांची जप्ती करण्यात आली असून, १३३ थकबाकी मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात आले आहे.




या संदर्भात झालेल्या आढावा बैठकीत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी विभागातील सर्व सहाय्यक मंडल अधिकाऱ्यांना थकबाकीदारांवर कोणतीही सूट न देता कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या बैठकीस शहरातील १८ विभागीय कार्यालयांतील सहाय्यक मंडल अधिकारी उपस्थित होते.

मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी विभागनिहाय स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, येत्या काही दिवसांत थकबाकीदारांना जप्ती अधिपत्रे बजावण्यात येणार आहेत. अधिपत्र बजावल्यानंतरही जर संबंधित मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला नाही, तर त्यांच्या मालमत्तांवर प्रत्यक्ष जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या मोहिमेंतर्गत निवासी थकबाकीदारांची नळ कनेक्शन खंडित करणे तसेच बिगरनिवासी थकबाकीदारांच्या मालमत्तांवर थेट जप्ती अशी कारवाई केली जाणार आहे.

त्यामुळे नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत मालमत्ता कर तात्काळ भरून जप्तीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकासासाठी मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा महसूल स्रोत आहे. या कराच्या माध्यमातून शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा व शिक्षण व्यवस्था सक्षमपणे राबवली जाते. वारंवार सूचना व नोटिसा देऊनही मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर नियमान्वये कारवाई करण्यात येईल.
>
> **– तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

> मालमत्ता कर थकबाकीदारांची अचूक माहिती, क्षेत्रनिहाय नियोजन आणि वेळापत्रकबद्ध कारवाई या तीन बाबींवर भर देऊन ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक विभागीय कार्यालयामार्फत रोजच्या आढाव्यानुसार प्रगती तपासली जात असून, थकबाकीदारांनी तातडीने कर भरणा केल्यास जप्ती व नळ कनेक्शन खंडित करण्यासारखी कारवाई टाळता येऊ शकेल. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कर भरून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> **– पंकज पाटील,** उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका




### थकबाकीदारांची यादी केली जाणार प्रसिद्ध

ज्या थकबाकीदारांनी अद्यापही मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशा सर्व थकबाकीदारांची यादी महापालिकेमार्फत प्रसिद्ध केली जाणार आहे. ही यादी प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित थकबाकीदारांकडून याबाबत करण्यात येणारी कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नसल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित थकबाकीदारांनी जप्तीची कारवाई टाळण्यासाठी तात्काळ थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

Pune District Education Association's
# Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046